# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women In Distess Situation**

**Police Station** :- **Women Cell, Washim**

**Date of Good Work done** :- **05/02/2022**

**Brief of the work done :-**

मागील दोन वर्षापासून कोरोना च्या कालावधीत महिला समुपदेशन केंद्राकडे एकूण 250 तक्रारी प्राप्त झाली असून त्यापैकी मोडणारे 79 कुटुंबाचा संसार समुपदेशनाने सुरळीत सुरू केला आहे

लोकमत

# वर्षभरात वाचवले मोडणारे ४० संसार!

## वाशिमच्या समुपदेशन केंद्राचे यश: पोलीस, महिला बालविकास विभागाचे सहकार्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम:** कोरोना काळात कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांत वाढ झाल्याचे निर्दशनास येत आहे. महिला व बालविकास विभागांतर्गत पीडित महिला व बालकांवरील अत्याचार दूर करण्यासाठी स्थापित समुपदेशन केंद्रात दाखल तक्रारीवरून हे स्पष्ट होत आहे. यात वाशिम येथील समुपदेशन केंद्राने वर्षभरात मोडण्याच्या अवस्थेत आलेले ४० संसार वाचवून रुळावर आणलेत.

अत्याचार पीडितांना (महिला आणि बालक) झालेल्या मानसिक आघातातून बाहेर पडण्यास मदत करण्यासाठी समुपदेशनाची मदत पुरविण्यात येते. प्रत्येक पोलीस ठाण्यांत या समुपदेशन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. त्या ठिकाणी महिला व बालकांवरील

दाखल केल्या जातात. या तक्रारींचे वाचन करून समुपदेशकांमार्फत

वाशिम येथील शहर पोलिसांत कार्यरत समुपदेशन केंद्रात गतवर्षभरात दाखल

स्थितीत आलेले ४० जोडप्यांचे संसार जानेवारी ते डिसेंबर २०२१ या काळात

समुपदेशक अनिता काळे यांनी महत्त्वाची भूमिका वठविली आहे.

> कोरोना काळात कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांत वाढ झाली असून, गत दोन वर्षात वाशिम येथील समुपदेशन केंद्रात दाखल २५० तक्रारींपैकी ७९ प्रकरणांत जोडप्यांचे समुपदेशन करून संसार सुरळीत केले आहेत.
>
> **- अनिता हिरवे,** समुपदेशक, वाशिम

> कोरोना काळात समुपदेशन केंद्रातील तक्रारींचे प्रमाण वाढले आहे. या तक्रारीनंतर वैयक्तीक भेट, सामूहिक चर्चा, जोडप्यांत समन्वय निर्माण करून काही कुटुंबांना पुन्हा एकत्र आणण्यात यश आले आहे.
>
> **- वैशाली आरू,** सचिव, शांती निकेतन महिला विकास समिती, वाशिम

**समुपदेशनाद्वारे सुरळीत वर्षभरातील प्रकरणे**

| महिना | प्रकरणे | महिना | प्रकरणे |
|---|---|---|---|
| जानेवारी | ०५ | ऑगस्ट | ०३ |
| फेब्रुवारी | ०१ | सप्टेंबर | ०२ |
| मार्च | ०३ | ऑक्टोबर | ०३ |
| जुन | ०६ | नोव्हेंबर | ०४ |
| जुलै | ०३ | डिसेंबर | ०३ |

**दोन वर्षांत २५० तक्रारी**

कोरोना काळात कौटुंबिक हिसाचाराच्या घटनांत वाढ झाली असून, वाशिम येथील शहर पोलिसांत कार्यरत समुपदेशन केंद्रात गत दोन वर्षांत २५० तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यापैकी ७९ प्रकरणांत जोडप्यांचे संसार समुपदेशातून वाचविलेत, तर १६ तक्रारी महिला तक्रार निवारण कक्षाकडे वर्ग, ३५ प्रकरणांत गुन्हा, ११ तक्रारी जि.म. बा. कार्यालयातील संरक्षण अधिकाऱ्यांकडे वर्ग, तर ९१ तक्रारींवर समुपदेशन सुरु आहे.



Hello Washim
Page No. 3 Feb 05, 2022
Powered by: erelego.com